बुधवार, दि १२ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २४ वा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# देवाभाऊ मराठवाडा महाराष्ट्रात आहे का? - डॉ. संजय लाखे

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी काल सादर अर्थसंकल्पात बहिर्गोल भिंगातून शोधूनही मराठवाडा दिसत नाही. त्यामुळे मराठवाडा महाराष्ट्रात आहे किंवा नाही याचा खुलासा सन्माननीय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी करावं अशी मागणी मराठवाडा अनुशेष निर्मुलन आणि विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय लाखेपाटील यांनी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांना ईमेल पाठवून केली आहे.

या संदर्भात पाठविण्यात आलेल्या ईमेलमध्ये डॉ. लाखे पाटील यांनी म्हटले आहे की, १७ सप्टेंबर हैदराबाद मुक्ती संग्रामच्या अमृतमहोत्सवा निमित्ताने तत्कालीन मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत ४६,000 कोटी रूपयांच्या विकास योजना जाहीर केल्या होत्या परंतु त्यासाठी या अर्थसंकल्पात एक रूपयांची तरतूद दिसत नाही! असेही डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले असून, कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्यातील हक्काच्या पाण्यासाठी तरतूद ही नाही आणि हक्काच्या व वाढीव पाण्याच्या योजना नाहीत.तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ साली मराठवाड्यासाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी तातडीने वळवण्यासाठी योजना, मान्यता व आर्थिक तरतुदी ची घोषणा केली होती. तशी मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देऊन विभागीय आयुक्त (महसूल) छत्रपती संभाजी नगर यांची नियुक्ती ही करून तांत्रिक अभ्यास ही पुर्ण झाला होता पण आता परत मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी भाषणातून वचनबद्धता दाखवली होती पण त्यासाठी अर्थसंकल्पात एक रूपया ही तरतूद नाही. उलट नार पार (गिरणा) किंवा दमणगंगा गोदावरी एकदरे या पश्चिम वाहिनी नद्यांतून नदिजोड प्रकल्पातून आश्चर्यकारकरित्या मराठवाड्याला वगळले असून या योजनांतील पाणी जायकवाडी/गोदावरीमध्ये येणारच नाही असा डाव अर्थसंकल्पात तरतूद करून रचला असून गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या (नागपूर) खालपासून गोदावरी खोऱ्यातील राज्याच्या हक्काच्या १00 टिएमसी पाण्या पैकी केवळ ६५ टिएमसी पाण्यासाठी नळगंगा दुधगंगा हा ४५0 किमी कॅनॉल लांबीचा व तब्बल ८४000 हजार कोटी रूपयांच्या महाकाय नदीजोड प्रकल्पाची अर्थसंकल्प तरतूद केली असून या प्रकल्पामुळे नागपूर वर्धा यवतमाळ अकोला बुलढाणा आणि वाशिम जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून पिण्याचे पाणी, ऊद्योग, कृषी प्रक्रिया उद्योगासाठी पाणी वापर होणार असून या गोदावरी खोऱ्यातीलच प्रकलपातूनही अतिशय अन्यायकारक पध्दतीने मराठवाडा विभाग वगळला असून पाणी वाशिम जिल्ह्यातच थांबवले आहे. म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केवळ विदर्भ वऱ्हाड यांचाच प्राधान्याने पण अतिशय संकुचित विचार केला आहे हे स्पष्ट दिसते.



अन्यथा राज्य म्हणून नियोजन केले असते तर अतिशय तुटीच्या व मराठवाड्याच्या हितासाठी इसापूर धरण व येलदरी धरणात या योजनेचे पाणी टाकून पुढे परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातूरचा सिमावत भाग यासाठी पाणी सहज उपलब्ध करून आणता आले असते. पण का आणले नाही? आणि १00 टिएमसी पैकी केवळ ६५ टिएमसीच का अडवले? नियोजन व आर्थिक तरतुदी केल्या आणि उरलेले ३५ टीएमसी पाणी मराठवाड्याला न देता, आर्थिक/तांत्रिक नियोजन न करता, अर्थसंकल्पात तरतूद न करून सरळ नैसर्गिकरित्या तेलंगणा/आंध्रला का सोडले जात आहे? याचा मुख्यमंत्री, अर्थमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांनी तातडीने खुलासा केला पाहिजे! नसता या गोदावरी खोऱ्यातील हक्काच्या पाण्याचे तातडीने मराठवाड्यातील दुष्काळी भागासाठी नियोजन करावे अशी आग्रही मागणी डॉ संजय लाखेपाटील यांनी केली आहे.! तसेच गोदावरी अभ्यासगट क्र0२ मांदाडे कमिटीच्या माध्यमातून जायकवाडीचेच तब्बल ७ ते १२ टिएमसी पाणी कमी करण्याचा संतापजनक प्रकार केला जात असतांनाच मग पाणी उपलब्धता आणि आर्थिक/ अर्थसंकल्पीय तरतूदच नसतांना देवाभाऊ आणि सरकार मराठवाडा वाटर ग्रिड योजनेचा फुटका, गळका बँड आणखी किती दिवस वाजवून मराठवाड्यातील स्वाभिमानी जनतेला मुर्खात काढू इच्छितात यांचाही खुलासा करण्याची मागणी डॉ संजय लाखेपाटील यांनी केली आहे! तसेच कृष्णेचे हक्काचे पाणी देणार नाही, जायकवाडी त पाणी येऊ दिले जात नाही; आहे ते पान ३ वर

युवा आदर्श

## हरवले ...

निवडून आला नेता
जेसिबी भरून फुले
स्वागत करे उत्साही
चेहरे सुखानंदे फुले
पार्ट्या उत्साहे झोडे
रिकामे झाले प्याले
चित्त भरले भारावून
सर्वत्र सजवले ठेले
नेत्यांसोबत सेल्फी
फोटोला सगळे आले
हस्तांदोलन करताना
कसे झाले चांगभले
जर हेचं नेते आपले
लफड्यांत अडकले
बदलून जाईलं हवा
संबंध सारे तडकले
फोटो टरारा फाडले
व्हिडिओ सर्व पुसले
कोण कुठला साहेब
संबंध नाहीत कसले
ओळख पण दावेना
आप्त घनिष्ठ दुरवले
जिगरी दोस्त असूनि
रे भाऊगर्दीत हरवले

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### महाबोधी महाविहार मुक्तीसाठी जालना जिल्ह्यातील बौध्द अनुयायांचा क्रांती मोर्चा

# महाविहार बौध्दांच्या ताब्यात देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवार दि. ११ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मस्तगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून अंबड चौफुलीपर्यंत बौध्द अनुयायांनी महाबोधी महाविहार मुक्ती मोर्चा काढून महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात देण्याची मागणी केली. यावेळी जालना जिल्हा भिख्खू संघाच्या वतीने या मोर्चाचे नेतृत्व करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील सर्व आंबडकरी नेते, कार्यकर्ते, बौध्द अनुयायी हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे जगभरातील बौद्धांचे प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. परंतु, या महाविहार हे हिंदुच्या ताब्यातू आहे. त्यासाठीचा जो कायदा करण्यात आला होता, तो रद्द करण्यात यावा, सदरील महाविहार हे बौध्द भिख्खू संघाच्या ताब्यात देण्यात यावे यासह विविध मागण्याचे निवेदन भिख्खू संघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत राष्ट्रपती आणि नितेश कुमार यांना पाठविण्यात आले आहे. महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन हे बौद्धांच्या ताब्यात नाही. ते बौद्धांच्याच ताब्यात असावे, यासाठी हा क्रांती मोर्चा काढण्यात आला. यावेळी सर्वच पक्षातील आंबेडकरी नेते, सामाजिक कार्यकर्ते, बौध्द अनुयायी यांच्यासह महिला, पुरुष मोठ्या संख्येने




उपस्थित होते. मस्तगड येथून निघालेल्या मोर्चाचे अंबड चौफुली येथे सभेत रुपांतरीत झाले. त्यानंतर पू. भदन्त शिवली शाक्यपुत्र यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दरम्यान भन्ते शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो, भन्ते मनायू, भन्ते रेवत, भन्ते शीलरत्न, भन्ते अचलानंद, भन्ते जयरत्न बोधी, भन्ते संघपाल,भन्ते धम्मदीप, भन्ते संबुद्ध, भन्ते सागरबोधी, भन्ते सत्यदीप, भन्ते धर्मपाल, भन्ते विपस्सी, पान ३ वर

### आता प्रत्येक गावातील तलावांचे होणार पुनरुज्जीवन

# तलावातला गाळ काढण्यासाठी शासनाची खास योजना

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने या वर्षी जोरदार तयारी केली आहे. राज्यातील प्रत्येक गावांच्या तलावातील गाळ काढून त्यांचे पुनरुज्जीवन करणे, नाला खोलीकरण-रुंदीकरण करणे यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' तसेच 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजना ताकदीने राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासन करणार असून यासाठी पूर्ण राज्यात एकच दर निश्चित करण्यात आला आहे. कोणतीही स्वयंसेवी संस्था अथवा ग्रामपंचायतीला या कामांसाठी अर्ज करून जिल्हा प्रशासनाने दिलेल्या पद्धतीनुसार काम करता येईल. तसेच तलावातून काढलेला गाळ शेतात टाकण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे.

शासनाची ही योजना गावागावात पोहोचवणे, शेतकऱ्यांना गाळ घेऊन जाण्यासाठी प्रोहोत्सान देणे, जनजागृती करून जनआंदोलन उभे करणे, मागणी अर्ज निर्माण करणे तसेच गाळमुक्त धरण हे टेक्नॉलॉजी पोर्टल तयार करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. अशा प्रकारची कामे आणि हजारो गावात पाण्याची कामे करण्याचा बारा वर्षांचा अनुभव बीजेएसच्या पाठीशी आहे.



या योजनेत सहभागी होण्यासाठी सरपंचांनी आपल्या गावांचा मागणी अर्ज 'बीजेएस डिमांड अॅप'वर ऑनलाइन भरावा. बीजेएसने सर्व जिल्ह्यात नेमलेले प्रशिक्षित जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्रातील बीजेएसचे हजारो कार्यकर्ते हे बीजेएसच्या माध्यमातून शेतकऱ्यांना, ग्रामपंचायतींना, तालुका-जिल्हा प्रशासनाला सहयोग करण्यासाठी सज्ज आहेत. या योजनेच्या जनजागृतीसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनी बीजेएसला सहकार्य केले आहे. योजनेची सर्व माहिती 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या शासनाच्या पोर्टलवर दिली असून त्यासाठी ु.ीहळुररी.ले' ही वेबसाइट पाहावी. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त गावांनी तलावातील गाळ काढण्यासाठी, नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी त्वरित अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीजेएसचे पदाधिकारी नरेंद्र जोगड यांनी केले आहे.

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि १२ मार्च २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# संपादकीय

## महाराष्ट्राचे भाग्यविधाते

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्रीय राजकारणातील द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले, तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबी चे शिक्षण पूर्ण केले. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ साली मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली त्यांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ मध्ये चीन युद्धाच्या वेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक देशाच्या संरक्षणमंत्रीपदावर केली. परकीय अक्रमणाच्यावेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरीत्या पेलली. १९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरीत्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढिला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाचे उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले. महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेखन, व्यक्तिचित्रणपर आठवणी, प्रवासवर्णन, स्फुटलेखन, वैचारिक लेख, समीक्षणात्मक लेख, पत्रलेखन, भाषणे इत्यादी स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत ह मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत. यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारणातील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# यज्ञाचा प्रथमावतार असलेल्या अग्निहोत्राचे महत्त्व आणि लाभ

वातावरणाच्या शुद्धीसाठी प्रतिदिन 'अग्निहोत्र' करण्याची संकल्पना भारतीय संस्कृतीमध्ये आहे. अग्निहोत्राच्या उपासनेमुळे वातावरण शुद्ध होऊन एक प्रकारचे संरक्षककवच निर्माण होते. अगदी किरणोत्सर्गापासून संरक्षण करण्याचे सामर्थ्यही अग्निहोत्रामध्ये आहे. यासाठी ऋषिमुनींनीही यज्ञाचा प्रथमावतार असलेले अग्निहोत्र करणे हा उपाय सांगितला आहे. तो करण्यास अतिशय सोपा आणि अतिशय अल्प वेळेत होणारा; पण प्रभावी असा सूक्ष्मातील परिणाम साधून देणारा उपाय आहे. प्रतिदिन अग्निहोत्र करण्यामुळे वातावरणातील हानीकारक जीवाणूंचे प्रमाण लक्षणीय घटते, हेही आता वैज्ञानिक प्रयोगांद्वारे सिद्ध झाले आहे. प्रतिदिन अग्निहोत्र करणे, हे केवळ आपत्काळाच्या दृष्टीनेच नाही, तर नियमितही उपयुक्त आहे. 'विश्व अग्निहोत्र दिना'च्या निमित्ताने या लेखातून वाचकांना अग्निहोत्राची ओळख व्हावी आणि अग्निहोत्र करण्याचे महत्त्व आणि लाभही लक्षात यावा या दृष्टीने हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

अग्निहोत्र म्हणजे काय ? - अग्निहोत्र म्हणजे अग्न्यन्तर्यामी (अग्नीमध्ये) आहुती अर्पण करून केली जाणारी ईश्वरी उपासना. सूर्योदयाच्या, तसेच सूर्यास्ताच्या वेळी केली जाणारी सूर्याची उपासना म्हणजे अग्निहोत्र ! अग्निहोत्र म्हणजे कामधेनूच आहे. अग्निहोत्र करण्यासाठी वेळ सोडली, तर अन्य कशाचेच बंधन नाही. अग्निहोत्रासाठी पिरॅमिडच्या आकाराच्या पात्रात गायीच्या शेणाच्या गोवर्या, २ चिमूट अखंड तांदूळ आणि देशी गायीचे तूप यांच्या साहाय्याने प्रज्वलित केल्या जातात. त्यानंतर २ मंत्र म्हणून आहुती दिली जाते.




आज मनुष्याचे जीवन अतिशय धावपळीचे आणि तणावग्रस्त झाले आहे. अशा परिस्थितीत मानवजातीच्या कल्याणासाठी ऋषिमुनींनीच अग्निहोत्राचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. आपण श्रद्धापूर्वक तो अवलंबल्यास निश्चितच लाभ होईल.

अग्निहोत्र करण्याचे महत्त्व - त्रिकालज्ञानी संतांनी सांगितलेलेच आहे की, आता पुढे येणारा काळ हा भीषण आपत्काळ आहे. पुढे आपत्काळ आहे, असे म्हणण्यापेक्षा आता आपत्काळाला आरंभ झालाच आहे. सद्यस्थितीत तिसरे महायुद्ध कधीही होऊ शकते, अशी स्थिती आहे. दुसर्या महायुद्धापेक्षा आता जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रांकडे महासंहारक अशी अण्वस्त्रे आहेत. त्यामुळे ती एकमेकांविरुद्ध डागली जातील. या युद्धामध्ये अण्वस्त्रे उपयोगात आणली तर या अण्वस्त्रांपासून संरक्षण होण्यासाठी तसेच या अण्वस्त्रांपासून निघणारा किरणोत्सर्ग नष्ट करणाराही उपाय हवा. किरणोत्सर्गापासून संरक्षण करण्याचे सामर्थ्यही या अग्निहोत्रामध्ये आहे. अग्नीच्या साहाय्याने कोणीही करू शकेल असा हा उपाय म्हणजे अग्निहोत्र. असे या अग्निहोत्राचे विशेष महत्व आहे.

अग्निहोत्राचे लाभ - चैतन्यप्रदायी आणि औषधी वातावरण निर्माण होते.

अधिक सकस आणि स्वादिष्ट अन्नधान्य पिकणे - अग्निहोत्रामुळे वनस्पतींना वातावरणातून पोषणद्रव्ये मिळतात . अग्निहोत्राच्या भस्माचाही शेती आणि वनस्पती यांच्या वाढीवर उत्तम परिणाम होतो. परिणामतः अधिक सकस आणि स्वादिष्ट अन्नधान्य, फळे, फुले अन् भाजीपाला पिकतो.

इ. अग्निहोत्राच्या वातावरणाचा बालकांवर सुपरिणाम होणे - मुलांच्या मनावर उत्तम परिणाम होऊन त्यांच्यावर चांगले संस्कार होतात. चिडचिडी, हट्टी मुले शांत आणि समंजस होतात. मुलांना अभ्यासात एकाग्रता सहज साधता येते. मतिमंद मुले त्यांच्यावर चालू असलेल्या उपचारांना अधिक उत्तम प्रतिसाद देतात.

रोगजंतूंचे निरोधन - अग्निहोत्राच्या औषधीयुक्त वातावरणामुळे रोगकारक जंतूंच्या वाढीस प्रतिबंध होतो, असे काही संशोधकांना आढळून आले.

अग्निहोत्र साधना म्हणून प्रतिदिन नित्यनियमाने करणे आवश्यक असणे - अग्निहोत्र करणे ही नित्योपासना आहे. ते एक व्रत आहे. ईश्वराने आपल्याला हे जीवन दिले आहे. त्यासाठी तो आपल्याला प्रतिदिन पोषक असे सर्वकाही देत असतो. या प्रीत्यर्थ प्रतिदिन कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रतिदिन अग्निहोत्र करणे, हे आपले कर्तव्य आहे. तसेच ते साधना म्हणूनही प्रतिदिन करणे आवश्यक आहे.

अग्निहोत्राची कृती -

अग्निहोत्रासाठी अग्नी प्रज्वलित करणे

हवनपात्राच्या तळाशी गोवरीचा लहान आकाराचा एक चपटा तुकडा ठेवावा. त्याच्यावर गोवरीचे तुकडे तूप लावून अशा रीतीने ठेवावेत (गोवरीच्या उभ्या व आडव्या तुकड्यांचे २-३ थर) की, त्याद्वारे आतील पोकळीत हवा खेळती राहील. नंतर गोवरीच्या एका तुकड्याला गायीचे तूप लावून पेटवावा आणि तो तुकडा हवनपात्रामध्ये ठेवावा. थोड्या वेळात गोवऱ्यांचे सर्व तुकडे पेट घेतील. अग्नी प्रज्वलित होण्यासाठी हवा घालण्यासाठी हातपंख्याचा उपयोग करावा. अग्नी पेटवण्यासाठी रॉकेलसारख्या ज्वलनशील पदार्थांचा उपयोग करू नये. अग्नी निर्धूम प्रज्वलित असावा, म्हणजे त्याचा धूर निघू नये.

अग्निहोत्र मंत्र

या अग्नीच्या प्रज्वलिततेला मंत्ररूपी तेजाचे अनुष्ठान लाभल्याने अग्नीतून उत्पन्न होणाऱ्या तेजोलहरी थेट आकाशमंडलातील देवतांशी संधान साधून त्या त्या देवतांच्या तत्त्वांना जागृत करून वायूमंडलाची शुद्धी करून देणाऱ्या आहेत. मंत्रांच्या उच्चारांपासून उत्पन्न होणारी कंपने वातावरणात आणि त्यातील सजीव आणि वनस्पती यांवरही परिणाम करतात. अग्निहोत्राचे मंत्र त्यांच्या मूळ रूपात जसेच्या तसे कोणताही भेद न करता उच्चारले जावेत. मंत्रांचे उच्चार अग्निहोत्र-स्थानात गुंजतील अशा नादमय रीतीने, फार गडबडीने किंवा फार सावकाश न करता स्पष्ट आणि खणखणीत स्वरात करावे.

सूर्योदयाच्या वेळी म्हणावयाचे मंत्र
सूर्याय स्वाहा सूर्याय इदम् न मम
प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदम् न मम

सूर्यास्ताच्या वेळी म्हणावयाचे मंत्र
अग्नये स्वाहा अग्नये इदम् न मम
प्रजापतये स्वाहा प्रजापतये इदम् न मम

मंत्राचा भावार्थ : मंत्रांतील 'सूर्य', 'अग्नि', 'प्रजापती' हे शब्द ईश्वरवाचक आहेत. 'सूर्य, अग्नि, प्रजापती यांच्या अंतर्यामी असणाऱ्या परमात्मशक्तीला मी ही आहुती अर्पण करत आहे, 'हे माझे नव्हे', असा या मंत्राचा अर्थ आहे. या कृतीमध्ये हवनद्रव्ये अग्नीत समर्पित करावीत. हवन करतांना मध्यमा आणि अनामिका यांना अंगठा जोडून केलेली मुद्रा असावी. (अंगठा आकाशाच्या दिशेने ठेवणे). तसेच योग्य वेळीच म्हणजे सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळी (संधीकाली) अग्निहोत्र करणे अपेक्षित आहे. प्रजापतीलाच प्रार्थना करून सुरुवात आणि त्याच्याच चरणी कृतज्ञता व्यक्त करून हवनाचा शेवट करावा.

अग्निहोत्रानंतर करावयाच्या कृती -

ध्यान - प्रत्येक अग्निहोत्रानंतर शक्य तेवढी अधिक मिनिटे ध्यानासाठी राखून ठेवावीत. निदान अग्नी शांत होईपर्यंत तरी बसावे.

विभूती (भस्म) काढून ठेवणे - पुढील अग्निहोत्राच्या थोडे अगोदर हवनपात्रातील विभूती (भस्म) काढून ती काचेच्या अथवा मातीच्या भांड्यात साठवून ठेवावी. तिचा वनस्पतीसाठी खत म्हणून आणि औषधे बनवण्यासाठी उपयोग करता येतो.

विश्व अग्निहोत्र दिनाचे निमित्ताने संकल्प - अग्निहोत्र' ही हिंदु धर्माने मानवजातीला दिलेली एक अमूल्य देणगी आहे. अग्निहोत्र नियमित केल्याने वातावरणाची मोठ्या प्रमाणात शुद्धी होते. इतकेच नव्हे तर, ते करणार्या व्यक्तीची शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्तरावर लाभ होतो.वास्तू अन् पर्यावरण यांचेही रक्षण होते. चांगले आरोग्य अन् सुरक्षित जीवन जगण्यासाठी सूर्यादय आणि सूर्यास्त समयी 'अग्निहोत्र' करावे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्ससारख्या ७० देशांनीही अग्निहोत्राचा स्वीकार केला असून त्यांनी विविध विज्ञान मासिकांत त्याचे निष्कर्ष प्रसिध्द केले आहेत. त्यामुळे वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध झालेला हा विधी प्रत्येक नागरिकाने मनोभावे करायला हवा असा संकल्प करायला करूया .

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'अग्निहोत्र'**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे,**
**सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# महिलांनी कर्तृत्वाने सर्व क्षेत्र काबीज केले - नगराध्यक्षा बोराडे

## स्त्रीशक्तीचा जागर; कर्तबगार महिलांचा सन्मान



**मंठा । प्रतिनिधी -** महिलांनी आज आपल्या कर्तृत्वाने सर्व क्षेत्र काबीज केले आहे.आपण काम करत असलेल्या क्षेत्रात सर्वोच्च काम आपण करावे.आपली स्वतः ची नाविन्यपूर्ण ओळख निर्माण करावी. महिला भगिनींनी काम करत समाज व कुटुंबाच्या प्रगतीस हातभार लावावा. असे प्रतिपादन नगराध्यक्षा वंदनाताई वैजनाथ नाना बोराडे यांनी केले. त्या नगरपंचायत व ग्रामीण रुग्णालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तुत्वान महिलांच्या कार्याचा गौरव करत उत्कृष्ट कार्याबद्दल ५१ महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेविका यमुनाताई नारायण दवणे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर निकिता निकम , लिपिक श्रीमती पल्लवी आळसपुरे , पोलीस हेडकॉन्स्टेबल सविता फुलमाळी , कल्पना डोईफोडे , परिसेविका मीना पालवे,पो.कॉ. सुलाबाई मार्कड यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.निकिता निकम व त्यांच्या सहकाऱ्यांनी नगराध्यक्ष बोराडे यांचे आभार मानून ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने सत्कार केला. यावेळी डॉक्टर निकिता निकम यांनी बोलताना सांगितले की , महिलांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे , हे स्पष्ट केले. मानसिक , शारीरिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित व्यायाम व संतुलित आहार आणि ताणतणाव व्यवस्थापन यावर भर द्यावा , असे त्यांनी सांगितले. नगरसेविका यमुनाताई दवणे यांनी महिलांच्या सर्व क्षेत्रातील योगदान सविस्तरपणे विशद केले.

यावेळी पोलीस हेडकॉन्स्टेबल सविता फुलमाळी यांनी सांगितले की , प्रत्येक पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री असते एका स्त्रीला घर सांभाळून प्रत्येक जबाबदारी पार पाडावी लागते. आयुष्यात प्रत्येक अडचणीला तिला सामोरे जावे लागते , त्यामुळे प्रत्येक पुरुषाने स्त्रीचा सन्मान केला पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी पोलीस कॉन्स्टेबल संगीता मांडे , प्रियंका राठोड , अधिपरिचारिका श्रद्धा हजबे , परवीन सय्यद , शिल्पा बोरकर, सिमा शेळके, श्रीमती मयुरी झोड , श्रीमती प्रतिक्षा वाघमारे , विद्या मोरे , दिपाली कल्याणकर , चंद्रकोर राठोड यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## पान १ वरुन

### देवाभाऊ मराठवाडा ...

कमी करण्याचा घाट घातला जात आहे. पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी येऊच दिले जात नाही कदाचित गुजरातला तर दिले जात नाही ना? आणि नळगंगा दुधगंगा मधून मराठवाडा वगळला आहे नार पार गिरणा किंवा दमणगंगा एकदरे या योजना फक्त खानदेश साठीच आणि तसेच तांत्रिक नियोजन झाले आहे ही वस्तुस्थिती सुस्पष्ट दिसत असतांना, पुढच्या पिढीला दुष्काळच पाहू देणार नाही.! अश्या ठणठणाटी निवडणूक वल्गना देवा भाऊ कश्या करू शकतात? असे निर्ढावलेपण येतेच कसे? असाही अतिशय संतापजनक प्रश्न डॉ संजय लाखेपाटील विचारला आहे! एकंदर या अर्थसंकल्पात नव्या योजना सोडा पण जुन्या योजनांचा ना उल्लेख ना अर्थसंकल्पीय तरतूद ही वस्तुस्थिती आहे. तसेच निजामाच्या जोखडातून लढून मुक्ती मिळवलेल्या आणि विनाअट मराठी भाषिक महाराष्ट्र राज्यात सामिल झालेल्या मराठवाडा विभागाशी परंतु घटनेच्या ३७१ (२) कलमाने संरक्षण असलेल्या अविकसित, दुष्काळी अश्या मराठवाडा विभागाचा आणि येथील भोळ्याभाबड्या जनतेचा सरळसरळ विश्वासघात असल्याचा घणाघाती आरोप डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला असून देवेंद्र फडणवीस सरकारने या अन्यायाची तातडीने दुरुस्ती करावी अशी आग्रही मागणी केली आहे.

### महाविहार बौद्धांच्या ...

भन्ते करुनाबोधी, भन्ते संघप्रिय, व ब्रह्मानंद चौहान, सुधाकर निकाळजे सुदामराव सदाशिव, सुभाष घाडगे, शिवाजी आदमने, महेंद्र रत्नपारखे, संजय हेरकर, राजेश राऊत, सुरेश खंडागळे, निखिल पगारे, संदीप खरात, संदीप साबळे, सुनील रत्नपारखे, महेंद्र बनकर, संजय भालेराव, रोहिदास गंगातिवारे, सिद्धार्थ खरात, मधुकर बोबडे, प्रदीप रत्नपारखे, राजू मोरे, भास्कर घेवंदे, विशाल सोनवणे, गौतम वाघमारे, डॉ. सुशील सूर्यवंशी, छाया ताई हिवाळे, सर्व उपासक उपासिका क्रांती मोर्चा साठी उपस्थित होते. मोर्चा अत्यंत शिस्तीत निघाल्याने अनेकांचे मोर्चाने लक्ष वेधून घेतले.

# अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी सहभाग घ्यावा - अमर हबीब

**अंबाजोगाई । प्रतिनिधी -** या वर्षीही शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत म्हणून किसानपुत्र आंदोलनच्या वतीने १९ मार्च रोजी करण्यात येणाऱ्या अन्नत्याग आंदोलनात किसानपुत्रांनी अधिकाधिक सहभागी व्हावे, असे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी केले.

किसानपुत्र आंदोलनच्या वतीने अंबाजोगाई येथे १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलना निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अमर हबीब बोलत होते.

अमर हबीब पुढे म्हणाले की, देशातील ९० टक्के लोक शेतीवर अवलंबून असतांनापासुन शेतकरी आत्महत्या सुरु आहेत. तेंव्हापासून आजपर्यंत आर्थिक विवंचनेतून शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. आज शेतीवर अवलंबून असलेल्या शेतक-यांचे प्रमाण ९० टक्क्यांवरुन दहा ते पंधरा टक्क्यांवर आले आहे, मात्र शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण काही कमी झाले नाही, हे भीषण वास्तव चित्र आहे. किसानपुत्र आंदोलनाच्या वतीने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी मागील नऊ वर्षांपासून किसानपुत्र आंदोलन १९ मार्च रोजी अन्नत्याग आंदोलन राबवित आहे. अंबाजोगाई येथे हा उपक्रम गेली आठ वर्षापासून अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून यावर्षी स्थानिक संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांत किसानपुत्रांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमर हबीब यांनी केले.

बैठकीच्या प्रारंभी संयोजक सुदर्शन रापतवार यांनी १९ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये १९ मार्च रोजी सकाळी सामुहिक उपवास, सहवेदना रॅली, शेतकरी सहवेदना पुरस्कार, आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणींचा साडीचोळी देऊन सन्मान, शेतकरी आत्महत्या कारणे आणि मिमांसा या विषयावरील व्याख्यान आणि सामुहिक उपवास सोडण्याचा कार्यक्रम यांच्या संपूर्ण नियोजनाची माहिती दिली. या कार्यक्रमात अंबाजोगाई तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील बहिणींचा सहभाग जास्तीत जास्त कसा करुन घेता येईल यासाठी ॲड. संतोष पवार यांनी माहिती दिली तर आत्महत्याग्रस्त शेतकरी बहिणीच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन संबंधीची माहिती शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी दिली. या बैठकीत अच्युत बापु गंगणे, वसंतराव मोरे, अनिता कांबळे, अनिरुद्ध चौसाळकर, प्रा. शांती नाथ बनसोडे, मदन परदेशी, महावीर भगरे यांनी उपयुक्त सूचना केल्या.

नगर परिषद परीसरातील पत्रकार कक्ष येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस अमर हबीब, कालिदास आपेट, प्रा. शांतिनाथ बनसोडे, मुजीब काजी, अनिरुद्ध चौसाळकर, अच्युत गंगणे, मदन परदेशी, संतोष बोबडे महावीर भगरे, व्यंकटेश जोशी, वसंत मोरे, इस्माईल शेख, लखन होके, कल्याणराव भगत, रेखा देशमुख, किरण देशमुख, अनिता कांबळे, प्रतिभा अवचर, दत्तात्रय अंबेकर, ॲड. माणिकराव बावणे व इतर उपस्थित होते.






## साऊ ज्योती सोशल फाउंडेशनचा महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार नगरसेवक बाबुराव हिवाळे यांना जाहीर



**परतूर । प्रतिनिधी -** पुणे येथील साऊ ज्योती सोशल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा 'महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार' नगरसेवक तथा पालिका गटनेते बाबुराव हिवाळे यांना जाहीर झाला आहे. मागील २५ वर्षातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदानाची दखल घेत हिवाळे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे निवड समितीने जाहीर केले आहे. येत्या २३ मार्च रोजी पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार हिवाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकार संघाच्या वतीने बाबुराव हिवाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय देसाई, अर्जुन पाडेवार, राजकुमार भारुका, कैलास सोळंके, आशिष गारकर, अजय कांबळे, जालिंदर चव्हाण आदींची उपस्थिती होती.



युवा आदर्श
जालना | बुधवार, दि १२ मार्च २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# बोधी गया महाविहार मुक्तीसाठी एक दिवसीय धरणे आंदोलन

**परतूर । प्रतिनिधी -** बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी परतूर शहरात एसडीएम कार्यालयासमोर भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले. या आंदोलनामध्ये परतुर तालुक्यातील श्रद्धावान उपासकांनी उपस्थित राहून भारतीय बौद्ध महासभेने पुकारलेल्या या धरणे आंदोलनास भरघोस प्रतिसाद दिला. रस्त्यावर उतरून महाबोधी विहाराच्या मुक्तीसाठी आपल्या भावना व्यक्त केल्या. शहरातून आणि विविध गावातून आलेल्या महिला उपासकांनी शुभ्र वस्त्र परिधान करून आणि पंचरंगी ध्वज हाती घेऊन भगवान बुद्धाचा जयघोष करत परतुरचे रस्ते दुमदुमून टाकले आणि सरकारने दुर्लक्षित केलेल्या या जागतिक घटनेकडे परतुर करांचे लक्ष वेधले. उपविभागीय कार्यालयाच्या गेट समोर एक दिवस लाक्षणिक धरणे आंदोलन करून उपविभागीय अधिकारी यांच्याद्वारे महाबोधी महाविहार मुक्ती साठीचे निवेदन मा. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री बिहार पाठवण्यासाठी सुपूर्त केले. याप्रसंगी भंते शांतीरत्न, तालुकाध्यक्ष रामचंद्र पानवाले, राम प्रसाद थोरात, एकनाथराव कदम, अर्जुन पाडेवार, गौतम खंडागळे, गुलाब दंवडे, डी,एन,प्रधान, भिमराव पंडित, शेषराव झोटे, बाबासाहेब खरात, चोखाजी सौंदर्य, महेंद्र वेडेकर, रोहन वाघमारे, शिवाजी डोळस, अशोक ठोके, अनिस मोरे, सनी गायकवाड, मंगलताई पानवाले, येणूबाई लांडगे, त्रिशला सातपुते, शांताबाई वाघमारे, कल्पना रोहन वाघमारे, संजीवनी बंड, भगवान सोनपसारे, गौतम गरड, सुरेखा चव्हाण, राहीबाई गायकवाड, कोंडाबाई शेजुळ, रत्नाताई सोनवणे, अनिता गायकवाड, सुमनबाई गरड, अनिता शिंदे, सुलोचना गरड, सुशिलाबाई खरात, शकुंतला गरड, शालिनी पाडेवार,, भास्कर घुगे, लहू अश्रुबा गरड, संतोष कोळे, रमेश पाईकराव अभिषेक सरोदे, राजेभाऊ घुगे आदींची उपस्थिती होती.



# बाळासाहेब तनपुरे यांचा अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब आसाराम तनपुरे यांनी दि. ०४ मार्च रोजी शरद पवार गटाला सोडचिट्टी देत सत्ताधारी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबई येथे प्रवेश केला. यावेळी बाळासाहेब तनपुरे यांचा श्री तटकरे यांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारसरणी तळागाळापर्यंत पोहोचून पक्षाचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. यावेळी आमदार शिवाजी गर्जे, प्रदेश सरचिटणीस रवींद्र तौर यांची उपस्थिती होती. बाळासाहेब तनपुरे यांचे या पक्षप्रवेशामुळे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मॉरिशसचा सर्वोच्च पुरस्कार, हा सन्मान मिळवणारे ठरले पहिले भारतीय

**नवी दिल्ली -** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. दरम्यान मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन’ देण्याची घोषणा केली आहे. मॉरिशसचा हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय ठरले आहेत.

पोर्ट लुईस येथे झालेल्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोरच रामगुलाम यांनी ही घोषणा केली. यानंतर मॉरिशसच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी रामगुलाम यांचे आभार मानले. यावेळी ते म्हणाले की, त्यांनी मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारला आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींना आतापर्यंत विविध देशांकडून २१ पुरस्कार मिळाले आहेत.

हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मॉरिशसच्या पंतप्रधानांनी नुकतेच जाहीर केले की, ते मला त्यांचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करणार आहेत. मी त्यांचा निर्णय नम्रतेने स्वीकारू इच्छितो. हा भारत आणि मॉरिशसच्या ऐतिहासिक संबंधांचा सन्मान आहे.

मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी सांगितले की, १२ मार्च १९९२ रोजी मॉरिशस प्रजासत्ताक झाल्यापासून पाच परदेशी मान्यवरांना ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन’ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. दरम्यान १९९८ मध्ये नेल्सन मंडेला हे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यापूर्वी बार्बाडोस, गयाना, रशिया, भूतान, फ्रान्स, इजिप्त आणि अमेरिका या देशांकडून सर्वोच्च सन्मान मिळाला आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत. आज सकाळी ते पोर्ट लुईस येथे पोहोचले. उद्या, १२ मार्च रोजी होणाऱ्या मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभात भारतीय नौदलाच्या जहाजासह भारतीय संरक्षण दलांची एक तुकडीही सहभागी होणार आहे.

# जालना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा जगदीश मिनियार यांनी स्विकाराला कार्यभार

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांनी आज पदाचा कार्यभार स्विकारला. कार्यभार स्विकारल्या नंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व विभागांचा आढावा घेतला.

श्री. मिनियार हे मुळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील असून, त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे झाले. श्री. मिनियार यांच्या प्रशासकीय सेवेची सुरुवात सन १९९१ मध्ये तहसीलदार परभणी या पदापासून झाली. परिविक्षा कालावधीनंतर तहसीलदार कळंब, जिल्हा धाराशिव व त्यानंतर तहसीलदार अहमदपूर, जिल्हा लातूर येथे काम केले. त्यानंतर पदोन्नतीने उपजिल्हाधिकारी रोहयो परभणी, उपविभागीय अधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी जालना, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नांदेड, उपजिल्हाधिकारी रोहयो नांदेड, उपविभागीय अधिकारी नांदेड, त्यानंतर सहाय्यक आयुक्त, नरेगा नागपुर येथे काम केले.




त्यानंतर पदोन्नतीने अपर जिल्हाधिकारी झाल्यानंतर काही काळ पुणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, त्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत समृद्धी महामार्ग करिता समन्वयक त्यानंतर अपर जिल्हाधिकारी, हिंगोली पदावर काम केले. त्यानंतर पदोन्नतीने विभागीय अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) या पदावर छत्रपती संभाजीनगर येथे काम केले.

नुकतीच त्यांची नागरी सेवेतील अधिकारी म्हणून पदोन्नतीने भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नती झाली आहे. ३३ वर्षाच्या कार्यकाळात श्री. मिनियार यांनी विविध ठिकाणी विविध प्रकारची कामे केली असुन, त्यांना दीर्घ प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे नांदेड येथील गुरुतागद्दी कार्यक्रमात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. तसेच नरेगा आयुक्तालय नागपूर येथे महात्मा गांधी नरेगा योजनेच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण काम केले. हिंगोली जिल्हा निर्माण झाल्यानंतर नवनिर्मित जिल्ह्याच्या प्रशासनाची घडी बसविण्यामध्ये महत्त्वाचा सहभाग होता. कोविड महामारीच्या काळात विभागीय पातळीवरून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांसाठी ऑक्सिजन पुरवठा, औषधी पुरवठा दवाखान्यांमध्ये आधुनिक सोयी-सुविधा देण्यामध्ये समन्वयक या नात्याने त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली होती.

प्रशासनात आतापर्यंत कोणतीही चौकशी झालेली नसून, आतापर्यंत त्यांची संपूर्ण सेवा निर्विवादपणे पार पडली आहे. काम करताना सर्व स्तरातील नागरिक, अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच माध्यमाकडून चांगले सहकार्य लाभले असून, याठिकाणी ही जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीकोनातून काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आज त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी छत्रपती संभाजीनगर येथून बदलीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना या पदाचा त्यांनी कार्यभार स्विकारला आहे.

# शासनाच्या लोककल्याणकारी योजनाची प्रचाररथाच्या माध्यमातून प्रचार-प्रसिध्दी

**जालना । प्रतिनिधी -** शासनाच्या विविध कल्याणकारी सर्वसाधारण योजना व सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना व्हावी यासाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना व अनुसूचित जाती उपयोजना सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने तयार केलेल्या प्रचाररथाला आज प्रभारी जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आला. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी सर्वसाधारण योजना व समाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांवर आधारीत भित्तिपत्रिकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी, महिला बालविकास विभागाचे एस.जी. कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

या प्रचाररथाच्या माध्यमातून रेशीम शेती उद्योग-शेतकऱ्यांसाठी शाश्वत व सक्षम शेतीचा पर्याय, मॉडेल करिअर सेंटर केंद्र पुरस्कृत योजना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजना, बालविवाह प्रतिबंध कायदा:२००६, पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे तसेच सामाजिक न्याय विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, रमाई आवास (शहरी व ग्रामीण) घरकुल योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील मुला/मुलींसाठी शासकीय निवासी शाळा, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, सैनिक शाळेतील अनुसूचित जाती / विजाभज/विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतीगृहे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, अनुसूचित जातीच्या मुलां-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, गटाई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे या योजनांची माहिती प्रचाररथामार्फत लाभार्थ्यां पर्यंत पोहचविण्यात येणार आहे.

